SL. No. : L

ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 47 ]
Total No. of Questions : 47 ]

**CCE RR**

[ ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 8
[ Total No. of Printed Pages : 8

ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : **85-M**

**Code No. : 85-M**

# ವಿಷಯ : ಸಮಾಜ ವಿಜ್ಞಾನ

# Subject : SOCIAL SCIENCE

**( ಮರಾಠಿ ಭಾಷಾಂತರ / Marathi Version )**

**( ಹೊಸ ಪಠ್ಯಕ್ರಮ / New Syllabus )**

**( ಪುನರಾವರ್ತಿತ ಶಾಲಾ ಅಭ್ಯರ್ಥಿ / Regular Repeater )**

ದಿನಾಂಕ : 19. 06. 2017 ]
[ Date : 19. 06. 2017

ಸಮಯ : ಬೆಳಿಗ್ಗೆ 9-30 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 12-30 ರವರೆಗೆ ]
[ Time : 9-30 A.M. to 12-30 P.M.

ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 80 ]
[ Max. Marks : 80

**विद्यार्थ्यांना सामान्य सुचना :**

1. प्रश्न पत्रिकेमध्ये बहुपर्यायी आणि वस्तूनिष्ठ प्रकारचे 47 प्रश्न आहेत.

2. प्रश्न पत्रिका विरुद्ध बाजूच्या आच्छादनाने सील ( बंद ) करण्यात आली आहे. परीक्षा सुरू झाल्यावर उजव्या बाजूने कापून तुम्हाला ती उघडावयाची आहे. प्रश्न पत्रिकेमधील सर्व प्रश्न व्यवस्थित आहेत की नाहीत ते तपासून पाहा.

3. बहूपर्यायी आणि वस्तुनिष्ठ या दोन्ही प्रकारच्या प्रश्नांसाठी दिलेल्या सुचनांचे पालन करा.

4. उजव्या बाजूच्या कडेला ( काठावर ) असलेली संख्या पूर्ण गुण दर्शविते.

5. पेपरची उत्तरे सोडविण्यासाठी दिलेला जास्तीत जास्त वेळ प्रश्न पत्रिकेच्या पृष्ठावर वरील भागात दिलेला आहे. त्यामध्ये प्रश्न पत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटेही दिलेली आहेत.

येथून कापा

**TEAR HERE TO OPEN THE QUESTION PAPER**
प्रश्न पत्रिका येथून कापून उघडा

**Tear here**

I. प्रत्येक प्रश्नाला किंवा अपूर्ण वाक्यांशला चार बहुपर्यायी उत्तरे दिलेले आहेत. त्यापैकी एक पर्याय बरोबर आहे. बरोबर असलेला पर्याय निवडून, इंग्रजी मुळाक्षरासह पूर्ण उत्तर उत्तरपुस्तिके मध्ये लिहा : $10 \times 1 = 10$

1. **गट - A** मध्ये नेते आणि **गट - B** मध्ये त्यांची पदे दिलेली आहेत. योग्य जोड्या लावणारा पर्याय शोधा .

| **गट - A** | **गट- B** |
|---|---|
| (a) जवाहरलाल नेहरू | (i) पहिले राष्ट्रपती |
| (b) डॉ० राजेंद्र प्रसाद | (ii) पहिले गृहमंत्री |
| (c) सरदार वल्लभभाई पटेल | (iii) राज्य पुनर्रचना आयोगाचे अध्यक्ष |
| (d) न्यायाधीश फझल अली | (iv) पहिले पंतप्रधान. |

| | ***a*** | ***b*** | ***c*** | ***d*** |
|---|---|---|---|---|
| (A) | iii | iv | i | ii |
| (B) | iv | i | ii | iii |
| (C) | i | ii | iii | iv |
| (D) | ii | iii | iv | i. |

2. 'शांती, अन्न, आणि जमीन' अशी प्रसिद्ध घोषणा खालील पैकी कोणी दिली ?

(A) जोसेफ स्टॅलिन

(B) मुसोलिनी

(C) माओ-त्से-तुंग

(D) लेनिन.

3. दहशतबाद्यानी 26/11 या दिवशी मुंबइतील हॉटेल ताजवरती हल्ला केला. त्याचे नाते याशो संबंधीत आहे.

(A) भारत — नेपाळ

(B) भारत — म्यानमार

(C) भारत — पाकिस्तान

(D) भारत — श्रीलंका.

4. 24 आक्टोबर 1945 हा दिवस महत्वाचा आहे, कारण

(A) संयुक्त राष्ट्र संघटनेची ( U. N. O. ) स्थापना झाली

(B) राष्ट्रकुल संघाची सुरुवात झाली

(C) युरोपियन समुदायाची स्थापना झाली

(D) सार्क ( SAARC ) ची स्थापना झाली.

5. कामगारांच्यातील तफावत दूर करण्यासाठी भारत सरकारने 1976 मध्ये हा कायदा अमलात आणला.

(A) नोकरी हमी कायदा

(B) अस्पृश्यता प्रतिबंध कायदा

(C) बालमजूर प्रतिबंध कायदा

(D) समान वेतन कायदा.

6. नकाशात दर्शविलेली योग्य जोडी लिहा.




(A) 1-कोसी, 2-नर्मदा, 3-हिराकुड

(B) 1-नागार्जुन सागर, 2-नर्मदा, 3-कोसी

(C) 1-नर्मदा, 2-कोसी, 3-नागार्जुन सागर

(D) 1-कोसी, 2-नागार्जुन सागर, 3-नर्मदा.

7. 'सवर्ण क्रांती' हा शब्द या क्षेत्रातील प्रगती दर्शविता.

(A) सोन्याची खाण (B) बागायती पिके

(C) दुग्ध व्यवसाय (D) मासेमारी.

8. 'भारताला योजित अथव्यवस्था' हे पुस्तक यानी लिहिले होते.

(A) सर एम॰ विश्वेश्वरय्या

(B) डॉ॰ एम॰ एस॰ स्वामिनाथन

(C) डॉ॰ वर्गिस कुरीयन

(D) डॉ॰ नॉरमन बोरलॉग.

9. बँक खात्यांच्या या प्रकारामध्ये ठेवीची रक्कम मुदतपूर्व काढली जावू शकत नाही.

(A) बचत खाते (B) चालू खाते

(C) रिकरिंग ठेव खाते (D) मुदत ठेव खाते.

10. डॉ॰ प्रताप रेड्डी याच्याशी संबंधीत आहेत.

(A) अपोलो हॉस्पिटल (B) रिलायन्स उद्योग

(C) विप्रो तंत्रज्ञान (D) जैविक तंत्रज्ञान संस्था ( Biocon Ltd. ).

II. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा : $14 \times 1 = 14$

11. कालचक्र म्हणजे काय ?

12. 1909 च्या मिंटो-मोर्ले सुधारणा कायद्याने भारताची विभागणी केली. कशी ?

13. कोणत्या युरोपियन राष्ट्राने भारताच्या एका प्रदेशावर फार वर्षे राज्य केले ?

14. कर्नाटक सरकारने डॉ॰ डी॰ एम॰ नंजुडप्पा या समितीची स्थापना का केली ?

15. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या ( U.N.O. ) विश्वस्त समितीचे कार्य कमी करण्यात आले. का ?

16. भारतीय घटनेतील कलम क्र० 24 काय जाहीर करते ?

17. भारत सरकारने प्रसूतीपूर्व गर्भ-लिंग निदान चाचणी प्रतिबंध कायदा अमलात आणला आहे. का ?

18. दक्षिण भारतातील सर्वात उंच शिखर कोणते ?

19. बदलती शेती भारतात कमी करण्यात आली आहे. का ?

20. पेट्रोलला 'द्रवरूप सोने' असे म्हणतात. का ?

21. भारतातील कोणत्या शहराला 'सिलिकॉन सिटी' असे म्हणतात ?

22. सुग्गीच्या नंतरचे तंत्रज्ञान म्हणजे काय ?

23. भारतात आर्थिक वर्षाचा कालावधी कोणता ?

24. जिल्हा औद्योगिक केंद्रे स्थापन करण्याचा भारत सरकारचा मुख्य उद्देश काय आहे ?

III. खालील प्रश्नांची **दोन** वाक्यात उत्तरे लिहा : 15 × 2 = 30

25. प्लासीच्या लढाईचे परिणाम काय झाले ?

26. श्रीरंगपट्टनच्या करारातील अटी कोणत्या आहेत ?

27. राजा राममोहन रॉय यांचे भारतातील सामाजिक आणि धार्मिक प्रबोधनाच्या चळवळीतील योगदान कोणते आहे ?

**किंवा**

सत्य शोधक समाजाने कोणत्या सुधारणांचा प्रसार केला आहे ?

28. नाझी विचारामूळे जर्मनीचा नाश कसा झाला ?

29. स्त्रियांचा दर्जा उंचावण्यासाठी भारत सरकारने कोणत्या उपाययोजना केलेल्या आहेत ?

30. दहशतवादाचे परिणाम कोणते ?

31. दंगलीच्या स्वरूपाचे वर्णन करा.

32. भारतीय शेती मान्सूनचा जुगार आहे. कसा ?

33. मातीच्या धपचे परिणाम कोणते ?

34. अरण्याचे संरक्षण कसे कराल ?

35. दूरसंवेदो तंत्रज्ञान ( Remote Sensing Technology ) नैसर्गिक प्रकोपाच्या प्रदेशामध्ये कसे उपयुक्त आहे ?

36. किनारपट्टी कोरणे आपण कसे रोखू शकतो ?

37. खेड्यातून शहराकडे निर्वासित गेल्यामूळ कोणते परिणाम झाले ?

38. दरडोई उत्पन्नाच्या विकासाचे योग्य रीतीने मोजमाप करता येत नाही. का ?

39. जागतिकीकरणामूळे परिसर प्रदूषणात मोठी वाढ झाली. स्पष्ट करा.

IV. खालील प्रश्नांची उत्तरे सहा **(6)** वाक्यात लिहा : $6 \times 3 = 18$

40. भारतीय स्वातंत्र्याचे पहिले युद्ध 1857 अपेक्षित निकाल देवू शकले नाही. कारणे द्या.

**किंवा**

भारतीयांच्या शिक्षण क्षेत्रात ब्रिटीश सत्तेचा प्रमुख परिणाम आहे. चर्चा करा.

41. भारताच्या परराष्ट्र धोरणाचे प्रभावी घटक कोणकोणते आहेत ?

**किंवा**

भारत-चिन सबंधात मागील काही दिवसापासून तणाव निर्माण होण्यास कोणती कारणे कारणीभूत आहेत ?

42. अस्पृश्यता निर्मुलन करण्यासाठी भारत सरकार कसे प्रयत्न करत आहे ?

**किंवा**

बेरोजगारी समस्या सोडविण्यासाठी कोणत्या उपाययोजना केलेल्या आहेत ?

43. भारतातील भू-मार्ग वाहतूकीच्या समस्या कोणत्या आहेत ?

**किंवा**

उद्योगधंद्याच्या स्थानिकिकरणावर परिणाम करणारे घटक कोणकोणते आहेत ?

44. ग्रामीण विकासात पंचायत राज संस्थेची भूमिका स्पष्ट करा.

**किंवा**

सार्वजनिक अर्थव्यवस्थेचे महत्व स्पष्ट करा.

45. बँक खाते उघडण्याने आम्हाला कोणकोणते फायदे होतात ?

**किंवा**

विमा उतरवतांना कोणकोणत्या गोष्टींची पूर्तता करावी लागते ?

V. खालील प्रश्नाचे उत्तर **आठ (8)** ते **दहा (10)** वाक्यात लिहा : 4

46. भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीतील बाळ गंगाधर टिळक यांची भूमिका स्पष्ट करा.

VI. 47. भारताचा नकाशा काढून खालील ठिकाणे दाखवा : 1 + 3 = 4

a) $23\frac{1}{2}^{o}$ उत्तर अक्षांस कर्कवृत

b) उत्कल किनारपट्टी

c) तुंगभद्रा धरण योजना.

**अंध विद्यार्थ्यांकरिता पर्यायी प्रश्न : ( प्रश्न संख्या 47 च्या ऐवजी )**

हिमालय पर्वताचे उपयोग कोणकोणते आहेत ? 4